
# आशा स्वयंसेविका योजना जिल्हा - अहमदनगर






# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
# "आशा" स्वयंसेविका योजना

..........................................................................

## गट प्रर्वतक (Block Facilitator)

"आशा" स्वयंसेविका योजना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील महत्वपुर्ण योजना असून महाराष्ट्रातील १५ आदिवासी जिल्हयात आशा स्वयंसेविकेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आशा स्वयंसेविका ग्रामपातळीवर माता व बालमृत्यूदर कमी करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. आशा स्वयंसेविकेची कार्ये सुयोग्य पध्दतीने व्हावे त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे आशा ंची समस्या गावपातळीवर सोडविता आल्या पाहिजे करिता १० आशास्वयंसेविकेसाठी १ गट प्रर्वतक महिला (Block Facilitator) ची नियुक्ती करण्यात येत आहे.

**(Block Facilitator )गट प्रवर्तकाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्याः**

- गट प्रर्वतकाने (Block Facilitator) आशा स्वयंसेविका व आरोग्य विभाग यांच्यामध्ये समन्वय साधणे उदा. ए.एन.एम., एल एच व्हि., अंगणवाडी सेविका, आय. सी. डी. एस. सुपरव्हायजर इ.
- आशा स्वयंसेविकांना येणाऱ्या अडचणी समजून घेणे तसेच आशांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करुन देणे व अडचणी सोडविणे.
- आशा स्वयंसेविकांना त्यांच्या कामाचा मोबदला वेळेवर मिळावा म्हणून पाठपूरावा करणे.
- आशा स्वयंसेविकेला देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण पुस्तिका १, २, ३, ४, ५ ला आवश्यकतेप्रमाणे उपस्थित राहुन गाव भेटी दरम्यान झालेल्या प्रशिक्षणाची उजळणी घेणे.
- प्रत्येक आशा स्वयंसेविकेला गट प्रवर्तक महिलेने महिन्यातून दोन भेटी देणे गरजेचे आहे.
- आशा स्वयंसेविकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र आणि तालूका सभेस उपस्थित राहणे व मार्गदर्शन करणे.
- आशा स्वयंसेविकेचा गावपातळीवर समन्वय साधण्यासाठी सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष, सहनियंत्रण समितीचे अध्यक्ष यांना भेटून आशा स्वयंसेविकेच्या भूमिकेविषयी माहिती देणे.

# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

राज्य आरोग्य सोसायटी, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

[illegible]

2803-39

राग्राआअ/आशा/कक्ष-२३/ / /०९

दिनांक : २ जुलै, २००९

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व)

**विषय -आशा स्वयंसेविका योजना**
**बिगर आदिवासी क्षेत्रात गट प्रवर्तक यांच्या त्वरीत नियुक्ती बाबत.**

संदर्भ - १) दि २३ जून २००८ रोजीचे राग्राआअ/आशा स्वयंसेविका/कक्ष -२३/२१६५-२२२४/०८ चे पत्र.
२) सन २००९-१० चा मंजूर PIP.

आशा स्वयंसेविका योजना आदिवासी क्षेत्रात सुरु असून बिगर आदिवासी क्षेत्रात राबविण्याबाबत दि.१७/११/०८ रोजीच्या पत्रान्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने बिगर आदिवासी क्षेत्रात आशा स्वयंसेविकेची नियुक्ती सुरु आहे. बिगर आदिवासी क्षेत्रात जिल्हा समुह संघटकांची निवड करण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सन २००९-१० च्या मान्यताप्राप्त PIP नुसार बिगर आदिवासी क्षेत्रात आशा स्वयंसेविकांची निवड करण्यात आलेली आहे. अशा बिगर आदिवासी कार्यक्षेत्रामध्ये प्रति प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एक याप्रमाणे गट प्रवर्तकाची नेमणूक करावयाची आहे.

**गट प्रर्वतक पदाची नियुक्ती करण्याकरीता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

१) गट विकास अधिकारी - अध्यक्ष
२) बाल विकास प्रकल्प अधिकारी - सदस्य
✡ ३) वैद्यकिय अधिकारी - सदस्य
✡ ४) तालूक्यातील आरोग्य क्षेत्रात किंवा तत्सम क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी - सदस्य
५) जिल्हा माता व बालसंगोपण अधिकारी - सदस्य
६) तालूका आरोग्य अधिकारी - सदस्यसचिव
७) वैद्यकीय अधिक्षक - ग्रामीण रुग्णालय

✡ तालूक्यातील स्वयंसेवी संस्थेचा एक प्रतिनिधी व तालुक्यातील एक वैद्यकिय अधिकारी हे समितीने निवडावेत.

**गट प्रवर्तकाचे निवडीसाठी खालीलप्रमाणे निकष राहतील -**

१) अर्जदार महिला असावी.

२) अर्जदार महिला संबधित प्राथमिक आरोग्य केंद्राचे क्षेत्रातील रहिवासी असावी.

३) वयोमर्यादा २१ ते ४० वर्ष असावी.

४) गट प्रवर्तक पदाची निवड झाल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र हे ठिकाण कामकाजाच्या दृष्टीने मुख्यालय म्हणून देण्यात येईल.

५) शैक्षणिक पात्रता किमान १२ वी सायन्स पास असावी. विज्ञान शाखेतील उच्च शैक्षणिक पात्रता धारकांना प्राधान्य राहील.

६) तालुकास्तरीय समितीने जाहिरातीद्वारे व विविध माध्यमातून प्रसिध्दी देऊन गटप्रवर्तक पदासाठी अर्ज मागवावेत.

७) प्राथमिक आरोग्य केंद्राचे कार्यक्षेत्रातील प्राप्त अर्जामधून छानती करुन शैक्षणिक पात्रतेप्रमाणे उमेदवारांची निवड करावयाची आहे. उच्चतम शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवाराची गुणवत्तेप्रमाणे यादी करावी. उच्च शैक्षणिक पात्रतेमध्ये उमेदवार नसतील तर टप्प्याटप्प्याने इ. १२ वी पास पर्यंतची शैक्षणिक पात्रतेप्रमाणे गुणवत्ता यादी करावी.

८) मुलाखतीसाठी १:५ याप्रमाणे उमेदवार बोलविण्यात यावेत. यामध्ये जास्त टक्केवारी असणाऱ्या महिलेची निवड करावी व तद्नंतरच्या दोन उमेदवारांची प्रतिक्षा यादी साठी निवड करावी.

९) तालुकास्तरीय समितीने मुलाखत घ्यावी. यामध्ये कागदपत्र पडताळणी, अनुभव, दौरे करण्याची क्षमता इत्यादी बाबी पाहाव्यात.

सन २००९-१० च्या PIP नुसार प्रत्येक बिगर आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्राला १ महिला गट प्रवर्तक महिला नेमण्यात यावी. गट प्रवर्तकास महिन्यातून २० दिवस ग्रामस्तरावर भेटी देणे बंधनकारक राहिल. गट प्रवर्तक महिलेस प्रत्येक दिवसाच्या गाव भेटीसाठी रु. १५०/- रुपये प्रवास खर्च व भत्ता देण्यात येईल. गट प्रवर्तक महिलेस रु. १५०/- रुपये प्रति दिन प्रमाणे दरमहा कमाल रु. ३०००/- अनुज्ञेय राहील. याशिवाय कामासाठी कोणतीही रक्कम देय राहणार नाही.

सदर समितीव्दारे गट प्रवर्तकाची निवड पूर्ण झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे प्रस्ताव मान्यतेस्तव पाठविण्यात यावा व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासून प्रस्तावास मान्यता द्यावी.

अभियान संचालक<br>
राज्य आरोग्य सोसायटी<br>
मुंबई

# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

''आशा'' स्वयंसेविका योजना

# बिगर आदिवासी क्षेत्रात आशा स्वयंसेविका नियुक्तीबाबत

## मार्गदर्शक सुचना

सन 2008–09

NRHM
महाराष्ट्र

# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

**राज्य आरोग्य सोसायटी, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय**

( नोंदणी क्र. : २३५४/२००५ दिनांक २३ ऑक्टोबर २००५ )

क्र :राग्राआअ/"आशा" नियुक्ती /कक्ष ३/ /०८
दिनांक : १७ नोव्हेंबर, २००८

प्रति
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, (सर्व)

विषय :राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत "आशा" स्वयंसेविका योजनेंतर्गत सर्व जिल्हयातील बिगर आदिवासी क्षेत्रात आशा स्वयंसेविकेची नियुक्ती करण्याबाबत...

संदर्भ : केंद्र शासनाचे दि. २३ सप्टेंबर २००८ रोजीचे पत्र

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आशा स्वयंसेविका योजना १५ आदिवासी जिल्हयांत राबविण्यात येत आहे. संदर्भिय पत्रान्वये राज्यातील सर्व ३३ जिल्हयातील बिगर आदिवासी क्षेत्रात (तसेच १५ जिल्हयात कार्यरत असलेल्या बिगर आदिवासी क्षेत्रात) आशा स्वयंसेविकेची नियुक्ती करण्याबाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने आशा स्वयंसेविकांच्या नियुक्ती प्रक्रियेची मार्गदर्शक सुचना सोबत जोडण्यात येत आहेत. सदर मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हयामध्ये पुढील कार्यवाही त्वरित सुरु करावी व सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये आपल्या जिल्हयाची माहिती त्वरित पाठवावी

अभियान संचालक
राज्य आरोग्य सोसायटी
महाराष्ट्र, मुंबई करिता.

प्रत

१. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)...............
२. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परिषद, (सर्व).............
३. जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी, जिल्हा परिषद,(सर्व).............
४. Community Mobiliser , जिल्हा परिषद, (सर्व).............

निरोगी गाव, निरोगी देश

आरोग्य भवन, ३रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी क्र. : ०२२-२२६२०२३५, फॅक्स क्र. : ०२२-२२६४ २१५५, ई मेल : mdnrhmmumbai@gmail.com

# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

# आशा स्वयंसेविका योजना

(Accredited Social Health Activist (ASHA) Scheme)

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत "आशा स्वयंसेविका" योजना आदिवासी बहुल १५ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. आरोग्य यंत्रणा, सेवाभावी संस्था व समाजातील अन्य महत्वपूर्ण घटक यांमध्ये सुसंवाद व समन्वय निर्माण करण्याच्या दृष्टीने "आशा" स्वयंसेविका महत्वपूर्ण दुवा आहे.

आरोग्य संवर्धन, विविध प्रतिबंधक व उपचारात्मक उपाययोजना तसेच समाजामध्ये जाणीव व जागृती वृध्दींगत करणे, यामध्ये "आशा" स्वंयसेविकेची महत्वाची भूमिका आहे. आरोग्य सेवा व आरोग्य संस्थांची माहिती सर्व घटकांपर्यंत उपलब्ध करुन देणे, आरोग्य सेवा सुविधांचा लाभ घेण्यासाठी लोकांना प्रोत्साहीत करणे. आरोग्याच्या बाबतीत लोकांमध्ये मानसिक व सामाजिक बदल घडवून आणणे इ. महत्वपुर्ण कामे आशा स्वयंसेविका करीत आहे. **सध्या** राज्यातील १५ आदिवासी बहुल जिल्हयामध्ये ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. **माहे सप्टेंबर २००८ पासुन राज्यातील सर्व जिल्हयातील बिगर आदिवासी भागामध्येही ही योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.**

**अ) आशा स्वयंसेविका निवडीसाठी अनुसरावयाची कार्यवाही :**

**१) आशा योजनेची संक्षिप्त माहिती**

- आशा गावची स्थानिक रहिवासी असेल.
- आशाची निवड ग्रामसभा करेल.
- ग्रामसभेने निवडलेल्या आशाची नियुक्ती तालुका आरोग्य अधिकारी करतील.
- आशाला नेमणुकीनंतर २३ दिवसाचे प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल.
- आशाने केलेल्या कामाच्या स्वरुपानुसार मोबदला दिला जाईल.

२)प्रत्येक गावात निवडावयाच्या आशांची संख्या

- गावात लोकसंख्यानुसार साधारणतः १००० लोकसंख्येस १ याप्रमाणात आशा निवडण्यात येतील. त्यानुसार आशांची गाववार संख्या खालीलप्रमाणे असेल

लोकसंख्या निकष :

१. १५०० पर्यंत लोकसंख्या असल्यास १ आशा स्वयंसेविका

२. १५०० ते २५०० लोकसंख्या असल्यास २ आशा स्वयंसेविका

३. २५०१ ते ३५०० लोकसंख्या असल्यास ३ आशा स्वयंसेविका

४. त्यानंतर प्रत्येक १००० लोकसंख्येसाठी १ ज्यादा आशा स्वयंसेविका

उपरोक्त निकषाप्रमाणे प्रत्येक गावातून आवश्यकतेनुसार आशा स्वयंसेविकेची निवड करावी.छोटया वाडया वस्त्या असल्यास त्या १००० लोकसंख्येपर्यंत एकत्र करुन त्यांचेसाठी एक आशा निवडावी.

**३) आशा स्वयंसेविका निवडीसाठी आवश्यक अटी**

- आशा स्वयंसेविका किमान १० वी पास स्थानिक विवाहित महिला असावी. **उच्च शिक्षित महिलांना प्राधान्य** देण्यात यावे.
- महिला गावाची स्थानिक कायमची रहिवासी असावी. मोठया गावामध्ये १५०० लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असल्यास २ किंवा त्यापेक्षा जास्त आशा निवडताना गावाच्या त्या त्या भागातील स्थानिक महिला निवडावी.
- स्थानिक, आदिवासी, विधवा, परितक्त्या महिलांना व स्वयंसेवी संस्थाच्या कार्यकर्तीना प्रामुख्याने प्राधान्य देण्यात यावे.
- आशाचे वय २५ ते ४५ असावे.

**टिप : ज्या भागात लिंक कार्यकर्ती कार्यरत आहे तेथे त्यांची आणि ग्रामसभेची सहमती असल्यास आशा स्वयंसेविका म्हणून निवड करण्यास हरकत नाही.**

४) आशा स्वयंसेविका निवड प्रक्रिया

- साधारणतः ग्रामसभेच्या २ आठवडयापुर्वी ग्रामसेवकांनी आशा स्वयंसेविका योजनेबाबत गावात विविध प्रकारे माहिती द्यावी (दिवंडी, बचत गट, महिला मंडळ ग्रामपंचायतीच्या बोर्डावर व गावातील मध्यवर्ती ठिकाणी सुचना)
- **अंगणवाडी कार्यकर्ती व ए.एन.एम. यांनी आशा नियुक्त होण्यास पात्र असणाऱ्या** महिलांना याबाबत भेट घेऊन माहिती दयावी.
- आशा स्वयंसेविका पदाचे अर्ज प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र/अंगणवाडी/ग्रामपंचायत/ग्राम आरोग्य स्वच्छता व पाणी पुरवठा समिती चे अध्यक्ष येथे उपलब्ध असले पाहिजे व ते इच्छूक उमेदवारास विनामुल्य देण्याची व्यवस्था करावी.
- पूर्ण भरलेले अर्ज ग्राम सभेच्या एक दिवस अगोदर पर्यत अंगणवाडी कार्यकर्ती/ए.एन.एम/ ग्रामसेवक /ग्राम आरोग्य, स्वछता, व पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष या चौघांपैकी कोणाकडेही सादर करता येईल.
- ग्रामसभेच्या दिवशी अंगणवाडी कार्यकर्ती/ए.एन.एम/ग्रामसेवक/ग्राम आरोग्य, स्वछता, व पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष यांनी त्यांचेकडील अर्ज ग्राम आरोग्य, स्वछता व पाणी पुरवठा समितीस सादर करावे.
- ग्राम आरोग्य, स्वछता, व पाणी पुरवठा समिती चे अध्यक्ष , ग्रामसेवक तसेच ए.एन.एम./एल.एच.व्ही./वैद्यकिय अधिकारी यां तिघांपैकी किमान एक व स्थानिक नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत प्रत्येक अर्जास खालील मानकाप्रमाणे गुण देण्यात यावेत.

गुण देण्याची पध्दत

ग्राम आरोग्य, स्वछता, व पाणीपुरवठा समिती व ग्रामसेवक, स्थानिक नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी, अंगणवाडी कार्यकर्ता तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील ए.एन.एम/एल.एच.व्ही./वैद्यकिय अधिकारी यांचेपैकी किमान एक यांचे उपस्थितीत खालीलप्रमाणे अर्जदारास गुण देऊन निवड प्रक्रिया पुर्ण करावी.

| निकष | गुण | निवडीच्या अटी |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता - | ०६ गुण - | किमान १० वी पास महिला असावी फक्त १० वी पास असल्यास शुन्य गुण व यापुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या पात्रतेसाठी २ गुण याप्रमाणे गुण देण्यात यावे. (उदा. १२ वी पास असल्यास ४ गुण, **निवड समितीस जास्तीत जास्त ६ गुण देता येतील**) |
| कामाचा अनुभव - | ०५ गुण - | आरोग्य विषयक कामकाजाच्या अनुभवासाठी प्रत्येक एक वर्षाच्या अनुभवासाठी ०१ गुण याप्रमाणे देण्यात यावेत. चांगल्या स्वयंसेवी संस्थेची कार्यकर्ती असल्यास अधिक गुण देण्यात यावेत. (**निवड समितीस जास्तीत जास्त ५ गुण देता येतील**) |
| विधवा परितक्त्या - | ०२ गुण - | विधवा/परितक्त्या महिला असल्यास ०२ गुण पर्यंत देण्यात यावेत. |
| संभाषण व प्रोत्साहन कौशल्य- | ०२ गुण - | उत्तम संभाषण व प्रोत्साहन कौशल्य तर २ गुण दयावेत (**निवड समितीस जास्तीत जास्त २ गुण देता येतील**) |
| एकूण | १५ गुण | |

प्रत्येक उमेदवारास १५ पैकी गुण देण्यात यावेत. गूणानूक्रमानूसार किमान तीन व कमाल एकुण निवडावयाच्या आशाच्या संख्येच्या दुप्पट अर्ज ग्रामसभेत सादर करण्यात यावेत. उदा. १ आशा निवडावयाची असल्यास ३ अर्ज व ४ आशा निवडावयाच्या असल्यास ८ अर्ज ग्रामसभेस सादर करावेत. ग्रामसभा भरल्यानंतर आरोग्य कर्मचारी/वैद्यकीय अधिकारी यांनी ग्रामसभेस आशा कार्यक्रमाची व आशा कडुन देण्यात येणाऱ्या सेवांची माहीती दयावी.त्यानंतर ग्रामसभेने आरोग्य समितीमार्फत शिफारस केलेल्या उमेदवारापैकी सर्वात योग्य वाटणाऱ्या उमेदवाराची निवड करावी व तसा ठराव करावा. ग्रामसभेत मतभेद झाल्यास बहुमताचा निर्णय मान्य करण्यात यावा.

- उर्वरित महिलांपैकी एक महिला प्रतीक्षा यादीवर असेल.
- आशा स्वयंसेविका निवडीबाबत ग्रामसेवक तालूका वैद्यकिय अधिकाऱ्यांना लेखी सुचना व ठरावाची प्रत देईल.
- तालूका वैद्यकिय अधिकारी आशा स्वयंसेविकेच्या निवडीचे पत्र संबंधित महिलेस कार्यालयातून निर्गमित करेल.

## आशा स्वयंसेविकेच्या भूमिका व जबाबदा-या

- संस्थेतील प्रसुती वाढविणे.
- मलेरिया, क्षयरोग, साथरोग उपचारासाठी मदत
- मोफत संदर्भ सेवेचा प्रचार
- कुटुंब कल्याण प्रचार, गर्भनिरोधकाचे वाटप
- साध्या (किरकोळ) आजारावर उपचार उदा. ताप, खोकला यावर औषधी संचातील औषधाचा वापर
- माता व बाल आरोग्य विषयी प्रबोधन उदा. प्रसुतीपुर्व तपासणी, लसीकरण, स्तनपान, लोहयुक्त गोळया, आहार इत्यादी
- जन्म, मृत्यू नोंदणी मध्ये मदत
- ग्राम आरोग्य पोषाहार दिनामध्ये मदत
- वेळोवेळी शासनाच्या सुचनेनूसार

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
## आशा स्वयंसेविकेचे प्रशिक्षण

- "आशा" स्वयंसेविकेची नियुक्ती झाल्यानंतर "आशा" स्वयंसेविकेला सात दिवसांचे मूलभूत प्रशिक्षण देण्यात येईल. यावेळी तिला सर्व समावेशक असे प्रशिक्षण पुस्तिका पुरविण्यात येतील.
- या मूलभूत प्रशिक्षणानंतर दर दोन महिन्यातून एकदा पुर्नप्रशिक्षण आयोजित करण्यात येईल.
- याशिवाय कामाचे ठिकाणी आशा स्वयंसेविकेला प्रशिक्षण विळोवेळी देण्यात येईल.
- प्रशिक्षणाचे वेळी तिला प्रवासभत्ता तसेच रुपये १००/- दैनिक भत्ता देण्यात येईल.
- आशा स्वयंसेविकेच्या प्रशिक्षणाचे एकूण ५ टप्पे ठेवण्यात आलेले आहे.
- आशा प्रशिक्षण पुस्तीका १ चे प्रशिक्षण ७ दिवसाचे असेल तर प्रशिक्षण पुस्तीका २ ते ५ चे प्रशिक्षण प्रत्येकी ४ दिवसाचे असेल.
- एकुण प्रशिक्षण कालावधी २३ दिवसांचा असेल.
- सदर प्रशिक्षण आनंदायी स्वरुपाचे असेल त्यात भुमिका नाटय (Role Play) प्रात्याक्षिके, क्षेत्रभेटी, गटचर्चा याचा समावेश असेल.
- प्रशिक्षणाबाबत वेळोवेळी मासिक सभेत किंवा ए.एन.एम., अंगणवाडी सेविका मार्फत सुचना देण्यात येतील.
- आशा स्वयंसेविकेची भूमिका बजावण्यासाठी प्रशिक्षण अतिशय महत्वाचे असून आशा स्वयंसेविकेने कोणत्याही प्रशिक्षणास गैरहजर राहू नये किंवा प्रशिक्षण काळात उशिरा उपस्थिती दर्शवू नये.
- सदर प्रशिक्षण मार्च २००९ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे.
- आशा प्रशिक्षणापूर्वी प्रत्येक जिल्हयाने निश्चित केलेल्या संख्येनूसार प्रशिक्षकाचे प्रशिक्षण जिल्हा स्तरावर होणार आहे. त्यानंतरच आशा स्वंयसेविकेच्या प्रशिक्षणास प्रारंभ होईल.

## आशा स्वयंसेविका पदासाठी अर्जाचा नमुना

संपुर्ण नाव :............................................................

गाव/पाडा/वस्ती/वार्ड क्र :............................................................

वय :............................................................

दुरध्वनी/मोबाईल क्र. :............................................................

पत्ता :............................................................

अर्जदाराची माहिती :

| अ क्र | पात्रतेच्या अटी | अर्जदाराने भरावयाची माहिती | (फक्त कार्यालयीन कामासाठी) अर्जदाराने यामध्ये माहिती भरु नये | |
|---|---|---|---|---|
| | | | निर्धारित गुण | प्राप्त गुण |
| १ | शैक्षणिक पात्रता | | ६ | |
| २ | कामाचा अनुभव **(वर्षामध्ये लिहावे)** | | ५ | |
| ३ | विधवा परितक्त्या **(होय किंवा नाही लिहावे)** | | २ | |
| ४ | संभाषण कौशल्य व प्रोत्साहन कला अवगत **(होय किंवा नाही लिहावे)** | | २ | |

वर दिलेली माहिती सत्य असून सदर माहितीत काही चूक आढळल्यास होणाऱ्या कार्यवाहीस मी जबाबदार राहील.

दिनांक :...............

स्थळ :...............

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

टीप : १. अर्जदाराने शैक्षणिक पात्रता व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत जोडावेत.

२. भरलेले अर्ज अंगणवाडी कार्यकर्ती/ए.एन.एम/ग्रामसेवक/ग्राम आरोग्य, स्वछता, व पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष या पैकी कोणत्याही संबंधित एका व्यक्तीकडे अर्ज ग्रामसभेच्या १ दिवस अगोदर सादर करावेत.

३. अपुर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.